• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३४१ • बुधवार,दि. १३ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 341 • Wednesday 13 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# मोदी सरकारकडून महिलांना 15 हजार

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

केंद्र सरकार वेळोवेळी देशातील नागरिकांसाठी विविध योजना आणत असते. वेगवेगळ्या भागातील लोकांसाठी वेगवेगळ्या योजना आहेत. विशेषत: महिलांसाठी काही योजना आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठी अशीच एक योजना सुरू केली आहे. ज्याचे नाव आहे नमो ड्रोन दीदी योजना. ही योजना २०२३ मध्ये सुरू झाली. या योजनेमुळे महिलांना कृषी क्षेत्रात चालना मिळते. या योजनेत इतर कोणते फायदे उपलब्ध आहेत आणि त्याचा लाभ कसा घेऊ शकता जाणून घ्या सर्व माहिती. काय आहे नमो ड्रोन दीदी



योजना? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०२३ साली ही योजना सुरू केली. या योजनेंतर्गत महिलांना कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रे शिकवून त्यांना सक्षम बनवायचे आहे. या योजनेअंतर्गत बचत गटांशी संबंधित महिलांना १५,००० ड्रोन देण्याचे लक्ष्य आहे. नमो ड्रोन योजनेअंतर्गत महिलांना ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासोबतच प्रशिक्षणादरम्यान दरमहा १५ हजार रुपयेही दिले जाणार आहेत. या योजनेंतर्गत उडणाऱ्या ड्रोनसोबतच महिलांना याबाबत तांत्रिक माहितीही दिली जाणार आहे. ड्रोनचा वापर विविध शेतीच्या कामांसाठी कसा करायचा याचे प्रशिक्षणही त्यांना दिले जाणार आहे. ज्यामध्ये पिकांच्या देखरेखीपासून ते कीटकनाशके फवारणी, खते आणि बियाणे पेरण्यापर्यंत सर्व काही शिकवले जाईल. ड्रोन दीदी योजनेअंतर्गत, ड्रोन आणि त्यासंबंधित उपकरणांच्या खरेदीसाठी एकूण रकमेच्या ८० % किंवा जास्तीस्त जास्त ८ लाख रुपये एवढी आर्थिक मदत केंद्र सरकारकडून दिली जाणार आहे. ड्रोनचा वापर आर्थिकदृष्ट्या जिथं शक्य असेल त्या भागातल्या महिला बचत गटांची आधी निवड केली जाईल आणि मग त्यांना ड्रोन पुरवले जातील. देशभरातल्या वेगवेगळ्या राज्यांमधून एकूण १५ हजार बचत गटांना ड्रोन पुरवले जातील. अर्ज कसा करायचा? या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांनी स्वयं-सहायता गटाशी संलग्न असणे आवश्यक आहे. या योजनेसाठी १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या सर्व महिला बचत गटांशी संबंधित आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी काही कागदपत्रे असणे आवश्यक आहे. ज्यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, स्वयं-सहायता गटाचे ओळखपत्र आणि पासपोर्ट आकाराचा फोटो समाविष्ट आहे. यासोबतच फोन नंबर आणि ईमेल आयडी असणेही आवश्यक आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की, सध्या या योजनेची अधिकृत वेबसाइट सुरू झालेली नाही.

## भाजपा आघाडी अब की बार चारसौ पार



**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा येत्या १५ मार्चपर्यंत होण्याची शक्यता आहे. 'अब की बार चारसौ पार'ची घोषणा भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीची आहे. तर, यावेळी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला रोखण्यासाठी विरोधकांनी एकत्र येत 'इंडिया' ही आघाडी स्थापन केली आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक थेट होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत एका सर्वेक्षणाचे निष्कर्ष समोर आले असून त्यातून ४००हून अधिक जागा जिंकण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्ण होईल का, याचा अंदाज बांधण्यात आला आहे. टाइम्स नाऊ ईटीजीने लोकसभा निवडणुकीपूर्वी केलेल्या सर्वेक्षणाद्वारे आश्चर्यकारक निष्कर्ष समोर आले आहेत. आगामी निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी पुन्हा एकदा सत्तेत येईल, असा निष्कर्ष काढण्यात आला असला तरी, रालोआला ४०० जागा मिळवणे फार कठीण जाणार आहे, असा अनुमान देण्यात आले आहे. २०१९च्या तुलनेत सत्ताधारी रालोआच्या जागा वाढतील, असा अंदाज आहे. टाइम्स नाऊ ईटीजी रिसर्च सर्व्हेमध्ये सत्ताधारी रालोआ आघाडीला सुमारे ४०० जागा देण्यात आल्या आहेत. त्याचवेळी विरोधी पक्षांचे खछऊख-ला १०० हून अधिक जागा दाखविण्यात आल्या आहेत. या दोन आघाड्यांशिवाय वायएसआर काँग्रेस पक्षाला २१-२२ जागा मिळतील. नवीन पटनायक यांच्या बिजू जनता दलाला १०-११ जागा मिळण्याची शक्यता आहे. ११-१५ जागा इतर पक्ष आणि अपक्ष आमदारांना मिळू शकतात, असा सर्वेक्षणाचा निष्कर्ष आहे.

# खडी क्रेशर घोटाळ्यात जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व तहसीलदारांसह अधिकाऱ्यांना झापले -अ‍ॅड. देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यातील खडी क्रशर बोगस रीतीने चालू आहेत. परवानगी नसताना देखील खडी क्रेशर आणि खान पट्टा दोन्ही चालू असताना प्रशासनाने डोळे झाक केली होती. या प्रश्नावर जन आंदोलनाचे विश्वस्त अ‍ॅड. अजित एम. देशमुख यांनी आवाज उठवल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी याची तात्काळ दखल घेतली. जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, सर्व उपविभागीय अधिकारी आणि अभियंता अभियंता महावितरण यांना चोवीस तासात कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाची प्रत देशमुख यांनाही दिली आहे. जवळपास ८५



कोटी रुपयांचा महसूल या खडी क्रशर आणि खानपट्ट्या धारकांकडे थकलेला आहे. ही रक्कम महसूल प्रशासन जमा करत नाही. तसेच इ.टी.एस. द्वारे खानपट्ट्याची मोजणी करण्याचे आदेश देखील गुंडाळून ठेवलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला जर कनिष्ठ अधिकारी जुमानत नसतील तर जिल्हाधिकारी काय करतात ? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत होता. देशमुख यांच्या निवेदनाची जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेतली आहे. या सर्व अधिकाऱ्यांना आता खानपट्टा आणि स्टोन क्रेशर यांच्या बाबतचा अहवाल तात्काळ सादर करावा लागणार आहे. लायसन नसताना हे धंदे करणारे लोक राजकारणी आणि त्यांच्या निकट राहणारे लोक असल्यामुळे ते प्रशासनाला जुमानत नव्हते. प्रशासन देखील याकडे कानाडोळा करत होते. मात्र ड. देशमुख यांच्या निवेदनानंतर सर्व यंत्रणा हलली. जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांना आता कामाला लावण्यात आले आहे. तर दुसरीकडे ८५ कोटी रुपयांचा महसूल तात्काळ जमा करून घेण्याचे आदेश मात्र जिल्हाधिकारी यांनी संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना दिलेले नाहीत. त्याचप्रमाणे बेकायदेशीर वीज वापर होत असताना संबंधितावर गुन्हा दाखल करून विज बिल दंडात्मक रकमेसह वसूल करण्याचे आदेश देखील अभियंता अधीक्षक, महावितरण, बीड यांना दिलेले नाहीत. त्यामुळे हे आदेश देखील जिल्हाधिकारी यांनी तात्काळ द्यावेत,असेही देशमुख यांनी म्हटले आहे. जिल्हाधिकारी यांनी सर्व तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांना या प्रकरणात दिरंगाई आणि हलगर्जीपणा केल्याचे दिसून येत असल्याचे कळवले आहे. मात्र याच बरोबर या सर्वांना कारणे दाखवा नोटीस बजावने आवश्यक होते. ही नोटीस बजावलेली नाही. तसेच वीज मंडळाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता आणि सहाय्यक अभियंता यांचे वर देखील कारणे दाखवा नोटीस बजावणी आवश्यक आहे, असेही अ‍ॅड. देशमुख यांनी म्हटले आहे.

## भगवान शिव आणि विष्णु तत्वत-एकच -ह.भ.प श्रीराम महाराज विडेकर

**केज ! प्रतिनिधी**

कर्पूरगौरशिव आणि नील कलेवर श्रीराम( विष्णू) यांच्यात भेद करू नका या हरिहरामध्ये अनन्य प्रेम असून शिव आणि विष्णू तत्त्वत:एकच आहेत जे विष्णुला नमस्कार करतात ते शिवालाही नमस्कार करतात आणि जे विष्णुचा द्वेष करतात तर मग ते शिवालाही जाणत नाहीत आणि जे शिवस्वरुप जाणत नाहित ते विष्णुलाही जाणत नाहीत असे प्रतिपादन ह.भ.प श्रीराम महाराज विडेकर यांनी केले. विडा ता.केज येथे महाशिवरात्रीच्या निमात्ताने शिवजागर हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी ह.भ.प.श्'ईराम महाराज विडेकर यांनी



हरिहरा भेद । नाही नका करू वाद ।।
एक एकाचे हृदयी ।गोडी साखरेच्या ठाई ।। भेदकाशी नाड । एक वेलांटीच आड ।।
उजवे वाम भाग । तुका म्हणे एकची अंग ।।

या जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगावर सविस्तर निरूपण केले.पुढे बोलताना त्यांनी भारतीय संस्कृती विविधतेने नटलेली असून महाशिवरात्र हा एक पवित्र सण असून जो जीवन आणि जगामध्ये अंधार आणि अज्ञाना यावर मात करण्याची आठवण म्हणून चिन्हांकित करतो या महाशिवरात्र पर्वत जप, प्रार्थना, उपवास, आपल्यातील अमर चैतन्य शोधण्यासाठी योग, ध्यान करा याबरोबरच नैतिकता आणि सद्गुणांचा विचार करा असे आवाहन देखिल त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास ह.भ.प सखारामजी कदम, ह.भ.प उत्तम दादा आंधळे,ह.भ.प केशव महाराज,ह.भ.प पांडुरंग दादा,काका जाधव, बाळासाहेब निर्मळ,बबन पवार,ह.भ.प बळीराम बप्पा देशमुख,ह.भ.प बाबासाहेब भाऊ पटाईत,प्रा.जगन्नाथ पटाईत यांच्यासह परिसरातील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.हरिकीर्तन व प्रसादाचे आयोजन बाळासाहेब सावंत यांनी केले होते.

## वडिलांच्या नावाच्या आधी लागणार आईचे नाव

**मुंबई । वृत्तसेवा**

लाईव्ह ट्रेंडस न्यूज वृत्तसेवा । आईच्या नावाचा समावेश वेगळ्या स्तंभामध्ये न करता उमेदवाराचे नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरूपात नावनोंदणी सरकारी दस्तऐवजांमध्ये करणे बंधनकारक करण्याचा निर्णय झालेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ११ मार्च रोजी राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.त्यामुळे आता नावनोंदणीत आईचे नाव वडिलांच्या नावाच्या आधी असेल. १ मे २०२४ रोजी व त्यानंतर जन्मलेल्या सर्व बालकांच्या नावाची नोंद बालकाचे नाव, आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरूपातच करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



# सारूळ येथील विकास कामांसाठी ४० कोटींचा निधी -आ.नमिता मुंदडा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सारुळ येथे उच्च क्षमतेचे विद्युत उपकेंद्र निर्मितीसाठी ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने सारुळ उपकेंद्र निर्मितीसाठी मान्यता दिली. सदरील २२०/३३ केव्ही उच्च क्षमतेच्या उपकेंद्रातून जवळपास दहा लघु उपकेंद्रांना विद्युत पुरवठा करणे शक्य होणार आहे. विजेच्या वाढत्या मागणीमुळे केज तालुक्यातील लघु उपकेंद्रांना आवश्यक तेवढ्या दाबाने विद्युत पुरवठा होण्यास अडचणी येत होत्या. यामुळे विद्युत पुरवठा खंडित होणे, कमी दाबाने होणे अशा अडचणींना वारंवार तोंड द्यावे लागत होते. तसेच विद्युत पुरवठ्यासाठी अनेकदा केज, नेकनूर आणि कळंब उपकेंद्रावर अवलंबून राहावे लागत होते. याचा थेट परिणाम नागरिक, व्यापारी, उद्योगधंदे आणि शेतकऱ्यांना भोगावा लागत होता. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी सारुळ येथे उच्च क्षमतेचे विद्युत केंद्र निर्मितीसाठी प्रयत्न सुरू केले. त्यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले असून राज्य शासनाने सारुळ येथे २२०/३३ केव्ही उच्च क्षमतेचे विद्युत उपकेंद्र निर्मितीसाठी ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपकेंद्राची निकड लक्षात घेऊन याकडे विशेष लक्ष देऊन तत्काळ मंजुरी दिली. या उपकेंद्रामुळे केज १३२ केव्ही उपकेंद्रावरील लोड कमी होणार असून इतर जवळपास दहा लघु उपकेंद्रांना वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे. या उपकेंद्राच्या निविदा प्रक्रियेस सुरुवात झाली असून लागलीच वेगाने कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती आ. नमिता मुंदडा यांनी दिली. केज तालुक्याला अखंडित वीज पुरविण्याच्या हेतूने सारुळ उपकेंद्रास मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, खासदार प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## संपादकीय

# जिवनमान उंचावण्यासाठी

समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनमानाची गुणवत्ता वाढविणे, सर्वांच्या मूलभूत गरजा भागवून राहणीमान उंचावणारा आर्थिक विकास साधणे, सार्वजनिक जीवनात समानतेने सहभागी होण्याची संधी प्रत्येकास प्राप्त होणे, नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक संसाधने व संपत्तीचा साठा अबाधित ठेवून आर्थिक विकासाचा जास्तीत जास्त लाभ प्रत्येकास प्राप्त होईल अशा योजना आखणे आणि भविष्यातील पिढ्यांना त्रासदायक ठरणार नाही, अशा मानवसंपत्तीचा साठा तयार करणे, ही शाश्वत विकासाची काही वैशिष्ट्ये मानली जातात. अशा विकासातून गरिबीसारख्या समस्या कायमच्या दूर होऊ शकतात, असे मानले जाते. म्हणूनच या निकषांवर गेल्या १० वर्षांतील भारताच्या विकास आणि प्रगतीच्या वाटचालीचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते.` राजधानी दिल्लीत युनोच्या दक्षिण आशियाई विभागीय परिषदेत भारतापुढील समस्या, आव्हाने आणि उपाययोजना आदींवर व्यापक विचार झाला होता. सन १९५० ते २०१४ या सुमारे साडेसहा दशकांच्या काळात भारताची लोकसंख्या आठपट वाढली. शुद्ध हवा, शुद्ध पाणी, हरित क्षेत्र, मलमूत्र विसर्जनाच्या सुविधा अशी काही मुख्य उद्दिष्टे प्राधान्याने राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन या परिषदेच्या उद्घाटन सत्रात कोलंबिया विद्यापीठाचे डॉ. जेफ्री सचेस यांनी केले होते. भारताचे समाजजीवन हे मुख्यतः कोळशाच्या अर्थव्यवस्थेवर आधारित असून अन्न शिजविण्यासाठी सर्वत्र कोळशाचाच वापर केला जात असल्यामुळे हवेचा दर्जा अत्यंत निकृष्ट झाला आहे. त्यामुळे आरोग्याच्या समस्यांनी ठाण मांडले आहे, असे निरीक्षण त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात परखडपणे नोंदविले होते. केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नसून प्रगतीच्या वाटचालीतून हाती आलेल्या प्रत्येक फायद्याची पुनर्गुंतवणूक करून हे लाभ वाढविणे, त्यातून मानवी संसाधन शक्तीच्या विकासावर भर दिल्यास शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होतात, असे संयुक्त राष्ट्र संघाचे मत होते. खपवळर–उर्श्रीशश्रेशिपीं–णछ सन २०१४ पर्यंतच्या भारताच्या वाटचालीत या बाबींचा अभाव जाणवत असल्याखेरीज भारतात झालेल्या या परिषदेच्या उद्घाटन सत्रातच ही मते नोंदविली गेली नसती, हे ध्यानात घ्यावयास हवे. विकास ही अलिकडच्या शतकातील संकल्पना असून विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगती, दळणवळणाची साधने व राहणीमानातील दर्जावाढ व विशेषतः उत्पादन साधनांची वाढ आणि उत्पादनातील वाढ अशा मार्गांनी ही संकल्पना सामाजिक विकासाशी जोडली गेलेली आहे. विकासासोबतञ देशाच्या अस्मिताचिन्हांचा अभिमान जागविण्याचा संकल्प मोदी सरकारने सोडला. गेल्या १० वर्षांच्या वाटचालीत विकासाच्या प्रत्येक टप्प्यासोबत परंपरांची सांगड घालण्यातही यश येत गेले, हे २०१४ नंतरच्या प्रगती पुस्तकातील अधोरेखित ठरते. भौतिक विकासाद्वारे आधुनिकतेची वाटचाल करताना परंपरांचादेखील आदर व्हावा ही भावना पाश्चात्त्य राष्ट्रांकरिता काहीशी अपरिचित असली, तरी गेल्या १० वर्षांपासून भारतात सुरू असलेल्या परंपरा आणि नवतेची सांगड घालण्याच्या या प्रयोगाची फळे आता दिसू लागली आहेत. भारतासारख्या संस्कृतिसंपन्न देशात बदल हा परिवर्तनकारी असलाच पाहिजे, तो टप्प्याटप्प्याने पुढे जाणारा असला पाहिजे आणि नवतेचे संदर्भ या बदलाच्या प्रक्रियेने ध्यानातही घेतले पाहिजेत. असे झाले तरच बदल सहजपणे स्वीकारला जातो; ज्यातून दीर्घकाळासाठी काही साध्य होत असते. असे बदल शाश्वतपणे टिकून राहतात. त्याच्या पायावर प्रथा-परंपरांना नवी रूपे प्राप्त होत असतात. असे झाले की, विकासाच्या व प्रगतीच्या प्रक्रियेत परंपरांनाही स्थान मिळते. १० वर्षांपूर्वी २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या दिल्लीतील परिषदेत भारताच्या एकूण प्रगतीच्या स्थितीविषयी व्यक्त झालेल्या विचाराचा पाठपुरावा त्यानंतरच्या पुढच्या १० वर्षांत करताना, परंपरा आणि सामाजिक जीवनशैलीच्या परिवर्तनाचा प्रत्येक टप्पा परस्परांशी नाते सांधत पुढे सरकताना दिसतो. शाश्वत विकासाच्या आंतरराष्ट्रीय संकल्पनांच्या निकषावरच ही वाटचाल सुरू असल्याचेही स्पष्ट दिसते. गेल्या आठवड्यात मुंबईत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एका सोहळ्यात भारताच्या प्रगतीचा आढावा घेताना दिलेली माहिती भारताच्या प्रगतीची वाटचाल संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी सुसंगत दिशेने सुरू असल्याचे सुखद संकेत देणारी ठरते. निरोगी जीवनशैलीमध्ये वाढ करणे, दारिद्र्य नष्ट करणे, सामाजिक विषमतेची दरी बुजविण्याकरिता उपाययोजना आखणे, ही शाश्वत विकासाची उद्दिष्टे गाठण्यासाठी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बाबींकडे विशेष लक्ष द्यावे लागेल, असे मत संयुक्त राष्ट्र संघाच्या त्या परिषदेत व्यक्त झाले होते. खपवळर–उर्श्रीशश्रेशिपीं–णछ तसे झाल्यास शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होतात, असे मत त्या परिषदेत व्यक्त झाले होते. अमित शाह यांनी गेल्या शुक्रवारी मुंबईत आयजीएफच्या वार्षिक गुंतवणूक परिषदेत दिलेल्या माहितीतून संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमधील साम्य अधोरेखित झाले आहे. गेल्या १० वर्षांत मोदी सरकारच्या विविध उपाययोजनांमुळे देशातील ६० कोटी जनता अर्थव्यवहारांच्या मुख्य प्रवाहांशी जोडली गेली, असा दावा अमित शाह यांनी या परिषदेत केला.

# निलंग्यात ट्रॅक्टर- दुचाकीच्या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू

**लातूर । वृत्तसेवा**



ऊसाची वाहतूक करणारा ट्रॅक्टर आणि दुचाकीचा भीषण अपघात झाल्याची घटना निलंगा ते राठोडा या मार्गावरील अंबुलगा मेन येथे मंगळवारी घडली. या अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच चिरडून मृत्यू झाला. तर एकजण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर लातूर येथे उपचार सुरु आहेत. पोलिसांनी सांगितले, निलंगा तालुक्यातील अंबुलगा मेन गावाजवळ मंगळवारी सकाळी १०:३० वाजेच्या सुमारास ऊसाने भरलेला ट्रॅक्टर कारखान्याकडे निघाला होता. दरम्यान ट्रॅक्टर व दुचाकीचा समोरासमोर अपघात झाला. यात दुचाकीवरील गोविंद पांडुरंग कांबळे (वय ३५ रा. राठोडा), दिनकर रावसाहेब तोंडवळे (वय ४५ रा. अंबुलगा मेन) या दोघांचा जागीच चिरडून मृत्यू झाला. तर गोविंद मारुती गायकवाड (वय २५) हा तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर लातूर येथील रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच निलंगा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. यावेळी पोलीस निरीक्षक बालकृष्ण शेजाळ, सुनील पाटील, विनोद गोमारे, खंडू कांबळे यांनी पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी निलंगा येथील शासकीय रुग्णालयात पाठविले. याबाबत निलंगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. दरम्यान, धोकादायक पद्धतीने ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरखाली चिरडून दोघांचा जागीच मृत्यू झाल्याने मृतांच्या नातेवाईकांनी घटनास्थळावर आक्रोश करीत ट्रॅक्टरवर दगडफेक केली.

# लोकसभेसाठी काँग्रेसकडून ४३ उमेदवार

**नागपूर । वृत्तसेवा**



लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. काँग्रेसने ३९ उमेदवारांच्या पहिल्या यादीनंतर ४३ उमेदवारांची दुसरी यादी घोषित केली आहे. सहा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील ४३ उमेदवारांची ही यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये आसामचे १२, गुजरात ७, मध्यप्रदेश १०, राजस्थान १०, उत्तराखंड ३, दमन दीव १ अशा पद्धतीने ४३ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. या यादीत तीन माजी मुख्यमंत्र्यांच्या पुत्रांना उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान, १५ मार्चला काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची तिसरी बैठक होणार आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी काँग्रेसचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, कोषाध्यक्ष अजय माकन आणि प्रवक्ते पवन खेडा यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत के. सी. वेणुगोपाल यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवारांची दुसरी यादी घोषित केली. आज जाहीर झालेल्या यादीत काँग्रेसने आसाममधून काँग्रेसचे तरुण नेते गौरव गोगोई यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे. तर मध्य प्रदेशच्या छिंदवाडा मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांचे पुत्र नकुलनाथ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राजस्थानमधून माजी मुख्यमंत्री अशोक गहलोत यांचे पुत्र वैभव गहलोत यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. सोमवारी काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक पार पडली होती. यामध्ये ६ राज्यातील जवळपास ६२ जागांवर चर्चा करण्यात आली होती. त्यापैकी ४३ जागांवरील उमेदवारांची दुसरी यादी काँग्रेसने आज जाहीर केली. ४३ पैकी ३३ उमेदवारांचे वय हे ६० पेक्षा कमी आहे. काँग्रेसच्या दुसऱ्या यादीत खुल्या प्रवर्गातील १०, ओबीसी १३, अनुसूचित जाती १०, अनुसूचित जमाती ९, मुस्लीम १ असे ४३ उमेदवार आहेत. काँग्रेसच्या दुसऱ्या यादीतही सर्व समाज घटकांना स्थान दिल्याचा पुनरुच्चार काँग्रेसचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणूगोपाल यांनी यावेळी केला.

# बिबट्या शेतात मृतावस्थेत आढळल्याने खळबळ

**कडा । प्रतिनिधी**



रविवारी सायंकाळी आष्टी तालुक्यातील उंदरखेल परिसरातील तलावाच्या जवळ एका शेतात दीड ते दोन वर्षाचा बिबट्या मृतावस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. जखमी झालेल्या बिबट्याला अन्नपाणी मिळाले नसल्याने मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. सोमवारी सकाळी अकराच्या दरम्यान मृत बिबट्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आष्टी तालुक्यातील उंदरखेल येथील तलावाजवळ सुंदर सोनाजी पाखरे यांच्या शेतात जखमी अवस्थेतील बिबट्या असल्याच्या माहितीवरून रविवारी सायंकाळी वन कर्मचारी शेतात केले. यावेळी त्यांना मृतावस्थेतील बिबट्या आढळून आला. पाहणीत बिबट्याच्या अंगावर जखम आढळून आली. या जखमेमुळे शिकार करता येत नसल्याने अन्नपाण्याविना दोन दिवसांपूर्वी बिबट्याचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज सुलेमान देवळा येथील पशुवैद्यकीय अधिकारी धनजंय राजगुडे यांनी व्यक्त केला. दरम्यान, आज आष्टीच्या वनविभागाने पंचनामा करून मृत बिबट्याचे पशुवैद्यकीय टीमने शवविच्छेदन केले. मंगळवारी शवविच्छेदन अहवाल येताच मृत्येचे कारण समोर येईल. पिंपरी घाटा येथील वनपरिसरात बिबट्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आष्टीचे वनपरिक्षेत्र अधिकारी संजय ढगे, वनपाल बाबासाहेब मोहळकर, वनरक्षक ए.एस.काळे, याच्यासह वन कर्मचारी व पशुवैद्यकीय अधिकारी धनजंय राजगुडे याच्या टीमच्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ज्ञानज्योती सावित्री फुले यांना अभिवादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीच्या वतीने रविवारी मी तुमची सावित्रीबाई फुले या एकपात्री नाट्यप्रयोगाचे सादरीकरण सुप्रसिद्ध नाट्य कलावंत मेघना झुझम (पुणे) यांनी केले. आपल्या कसदार अभिनयातून झुझम यांनी अंबाजोगाईकरांची मने जिंकली. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. एकप्रकारे या एकपात्री नाट्यप्रयोगातून ज्ञानज्योतींच्या जीवनकार्याचा गौरवच करण्यात आला. मी तुमची सावित्रीबाई फुले या एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन रविवार, दिनांक १० रोजी अंबाजोगाई शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे तर विचारमंचावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प्रास्ताविक करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर यांनी सांगितले की, प्रबोधिनीच्या माध्यमातून मागील अनेक वर्षांपासून महामानवांना अभिवादन करण्यात आले, प्रासंगिक विषयावर वेळोवेळी निवेदने ही देण्यात आली आहेत. मान्यवरांच्या प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन ही करण्यात आलेले आहे. कोरोना काळात अनेक गरजू लोकांना आम्ही मदत ही केली आहे. तसेच होतकरू विद्यार्थी, महिला भगिनी, युवक, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ही आम्ही काम करीत आहोत. सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीच्या पुढाकाराने अंबाजोगाईत आज सुप्रसिद्ध नाट्य कलावंत मेघना झुझम (पुणे) यांच्या एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास आपण एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित राहून भरभरून प्रतिसाद दिला त्याबद्दल आपले सर्वांचे मनापासून आभार मानतो असे ॲड.जगतकर म्हणाले. तर उद्घाटक म्हणून बोलताना डॉ.सुरेश खुरसाळे यांनी या एकपात्री नाट्यप्रयोगाच्या आयोजनाचे कौतुक केले. या प्रसंगी आपल्या एकपात्री नाट्यप्रयोगातून मेघना झुझम (पुणे) यांनी सावित्रीबाई व महात्मा फुले यांच्या संपूर्ण जीवनकार्याचा परिचय सभागृहाला करून दिला. सावित्रीमाई, फातिमा शेख, मुक्ता साळवे यांचे ही संदर्भ दिले. प्रतिकुल परिस्थितीत सर्वधर्मीय मुलींना शिक्षण देणे. दत्तक मुलगा यशवंत, महात्मा फुले यांची ग्रंथ संपदा व कार्य, सत्यशोधक विवाह पद्धत याबाबतची विस्तृत माहिती दिली, स्त्रियांच्या बाजूने फुले दांम्पत्य उभे राहिले म्हणूनच स्त्रियांना आज सन्मानाने जगता येत आहे असा मौलिक संदेश या नाट्यप्रयोगातून दिला. मेघना झुझम (पुणे) यांनी आपल्या कसदार अभिनयाने अंबाजोगाईकरांना सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत खिळवून ठेवले. हा एकपात्री नाट्यप्रयोग अंबाजोगाईकरांना बेहद आवडला. उपस्थित मंत्रमुग्ध झालेल्या रसिक श्रोत्यांनीच मी तुमची सावित्रीबाई फुले हा एकपात्री नाट्यप्रयोगाचे यशस्वी सादरीकरण झाल्याचे सांगितले. एकपात्री नाट्यप्रयोग पहाण्यासाठी आद्यकवी मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात रसिक-श्रोत्यांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र घोडके आणि भागवत मसने यांनी केले. तर उपस्थितांचे आभार ॲड.माणिक आदमाने यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला संगीततज्ज्ञ राजकुमार ठोके आणि रमेश सरवदे यांनी विश्ववंदनिय महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारी प्रबोधनपर गीते सादर केली.


## जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.   /२०२४

अमर पि. भिमराव मांडवे विरूध्द ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, मसेवाडी, ता.जि.बीड

१) अमर पि. भिमराव मांडवे, रा. मसेवाडी, ता.जि.बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत पांडुरंग मारूती मांडवे यांचा दिनांक ०६/०१/१९८५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंद वहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास मृत्यू यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/ न.प. कार्यालयास मसेवाडी ता.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे मसेवाडी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्टरला घेवून मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/३/२०२४ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले.


सदर प्रकरणात पुढील तारीख  /  / २०२४ ही आहे.

स्वाक्षरीत/-
तहसिलदार,बीड


# लातूर येथील मराठवाडा रेल्वे कोच कारखान्याचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण

**लातूर । वृत्तसेवा**

रेल्वेच्या विविध उपक्रमांची पायाभरणी व विकासकामांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे मंगळवारी करण्यात आले. यावेळी लातूर येथील मराठवाडा रेल्वे कोच कारखान्याचेही लोकार्पण झाले. याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेल्वेला आधुनिक बनवून देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवू. वंदे भारत एक्सप्रेसची संख्या वाढविणार असल्याचे आश्वासित केले. दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या या लोकार्पण सोहळ्याला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा तर लातूर येथील कार्यक्रमस्थळी खा. सुधाकर श्रृंगारे, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी आ. सुधाकर भालेराव, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, सीआरपीएफचे उपमहानिरीक्षक संजीवकुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, रेल्वेचे




मुख्य कारखाना अभियंता सुबोधकुमार सागर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजपाचे प्रवक्ते गणेश हाके, सोलापूर रेल्वे विभागाचे सहायक व्यवस्थापक शैलेंद्रसिंह परिहार यांची उपस्थिती होती. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, विकसित भारताच्या दिशेने आपले मार्गक्रमण सुरु आहे. आपण लवकरच जगात विकसित देश म्हणून नावारुपाला येऊ. सध्या विजेवर चालणाऱ्या रेल्वेंची संख्या वाढली. वंदे भारत रेल्वेची संख्या वाढवून विस्तार केला जाईल. तसेच देशातील रेल्वे स्थानकांचा कायापालट होत आहे. भारतातील रेल्वे कारखान्यांना यामुळे अधिक काम मिळणार आहे. एकता मॉलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार असल्याचेही ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, कामगार व कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा तसेच लातूर येथील कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची समोयोचित भाषणे झाली. माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले, रेल्वे कोच कारखान्यामुळे मराठवाड्यातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. हा कारखाना लातूर येथे उभारण्यात यावा, यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तत्कालीन रेल्वेमंत्री पियुष गोयल, तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करण्यात आली होती त्यांनी ही मागणी मंजूर केली. कारखान्याच्या उभारणीसाठी लोकप्रतिनिधींनी सहकार्य केले. या कारखान्यामुळे इतर उद्योग लातूरला येण्यास मदत होणार असल्याचेही ते म्हणाले.

## गुजरातमध्ये ड्रग्स जप्तीची कारवाई

**नागपूर । वृत्तसेवा**

गुजरातमध्ये पुन्हा एकदा ड्रग्जविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे.गुजरातमधील पोरबंदरजवळ ४०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. गुजरात एटीएस, एनसीबी आणि तटरक्षक दलानं अशी ही संयुक्त कारवाई केली आहे.गेल्या ३० दिवसात गुजरात किनारपट्टीवर ड्रग्स जप्तीची ही मोठी कारवाई आहे. गुजरातमधील पोरबंदरजवळ ड्रग्सची तस्करी करणाऱ्या सहा जणांना ताब्यात घेतले आहे.तस्करी करणारे हे सहा पाकिस्तानी नागरिक आहेत.या सर्वांना पोलिसांनी अटक केली आहे.त्यांच्या बोटीची तपासणी केली असता तब्बल ४०० कोटी रुपये किमतीचा ड्रग्स साठा सापडला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी(१२ मार्च) दिली.ड्रग्सची तस्करी होत असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (छउइ), भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात दहशतवाद विरोधी पथक (-ढड) च्या अधिकाऱ्यांनी काल रात्री भारतीय हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करत असताना पाकिस्तानी नागरिकांना पकडले.यानंतर कारवाई करत सहा पाकिस्तानी आरोपीना अटक केली असून मोठ्या प्रमाणात असलेला ड्रग्स साठा जप्त करण्यात आला आहे.दरम्यान, गुजरात किनारपट्टीवर ड्रग्स जप्तीची घटना ही गेल्या ३० दिवसांतील दुसरी आहे. आणि तटरक्षक दलाच्या संयुक्त कारवाईत ३ हजार ३०० किलो वजनाचे हजारो कोटींचे ड्रग्ज जप्त करण्यात आले होते.

## मतदार संघात श्रेय घेण्यासाठी लढाई -आ.निलेश लंके

पाथर्डी - मतदारसंघात मी केलेल्या कामाचे कोणीही उद्घाटन करत आहे, मी कधीच



दुसऱ्याच्या कामाचे श्रेय घेत नाहीत. सध्या जिल्हा परिषदेत मंजूर झालेल्या प्रशासकीय मान्यता स्वतःच्या नावावर खपवल्या जात आहे. मी जे बोलतो तेच करतो, आमदार झाल्यापासून माझ्यामध्ये काहीही फरक झालेला नाही. काही लोकांनी कोरोना काळात विमानाने रेमडीसिवर आणून धंदे केले, ते कुठे गेलेत, ते विकले असा हल्लाबोल आ. निलेश लंके यांनी खासदार सुजय विखे यांचे नाव न घेता लावला. आमदार निलेश लंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळा तसेच दीड कोटी कामाच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन अकोळनेर येथे केले होते यावेळी ते बोलत होते.

## गिरणी कामगारांना घरे देणार

मुंबई - मुंबईतील बंद पडलेल्या ५८ गिरण्यांमधील कामगारांना घरे देण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला; मात्र घरे कुठे देणार, मुंबईत की मुंबईबाहेर याबाबत काहीच स्पष्टीकरण या निर्णयात नसल्याने लाखो कामगार आणि त्यांचे वारस संभ्रमात पडले आहेत. राज्य शासनाने आज घरे देण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी निधीची तरतूद कशी करणार याबद्दल सांगितले. गिरणी कामगारांच्या घरांसाठी सुमारे १५०० कोटी रुपये मुंबई महानगरपालिकेच्या निधीतून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रधान मंत्री शहरी आवास योजनेअंतर्गत संयुक्त भागीदारीद्वारे घरे बांधण्यात येणार आहेत आणि त्यासाठी महाहाऊसिंगच्या कार्यकक्षेचा विस्तार करण्यात येईल असे निर्णयात म्हटले आहे. गिरणी कामगारांसाठी घरे बांधण्याकरिता अनुदानापोटी ३ हजार कोटी रुपये गृहनिर्माण विभागाला तत्काळ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच एकतृतीयांश म्हणजेच एक हजार कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करून देण्यात येणार असून उर्वरित महाराष्ट्र निवारा निधीतून देण्यात येईल.

## खासगी मान्यताप्राप्त शाळांतील कर्मचाऱ्यांना आश्वसित प्रगती योजना

मुंबई - राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांतील कर्मचाऱ्यांना आश्वसित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यासाठी लागणाऱ्या ५३ कोटी ८६ लाख खर्चास देखील मान्यता देण्यात आली. अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९९४ पासून कालबद्ध पदोन्नती देण्यात येते. राज्य शासनाने १ ऑक्टोबर २००६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. याच धर्तीवर या शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देखील २ लाभांची ही योजना १ जानेवारी २०२४ पासून लागू करण्यात येईल.

## योजनांचा लाभ मिळवून दिला -आ.जगताप

नगर - बांधकाम कामगार हा असंघटीत घटक मानला जातो, त्यामुळे अनेक शासकीय योजनांपासून तो वंचित होता. परंतु जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी या बांधकाम कामगारांना एकत्रित करुन त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करत आहे या संघटनेच्या माध्यमातून कामगारांना गृह उपयोगी वस्तू मिळाल्या आहेत. पुर्वीही त्यांना स्टुल किट, पेटी, सुरक्षा साहित्य, स्कॉलरशिप, धनादेश अशा अनेक योजनांचा लाभ हा मिळवून दिला आहे. बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचवावे, त्यांनाही सन्मान मिळावा, शासनाच्या योजनांचा लाभ मिळून त्यांची प्रगती साधवी, यासाठी सुरु असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहे. हमाल-मापाडी यांनाही अनेक आंदोलनातून माथाडी कायदा लागू झाला. त्याची सुरुवात नगरमधून झाली ही अभिमानास्पद बाब आहे.

## पालक तोट्यात, शाळा नफ्यात

पुणे - शिक्षण हक्क कायद्यात खासगी शाळांच्या एक किलोमीटर परिसरात सरकारी शाळा असल्यास, मुलांचा प्रवेश सरकारी शाळेतच करावा लागेल, अशी अट घातल्याचा सर्वाधिक फटका पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पालकांना बसणार आहे. पुणे जिल्ह्यात अनेक नामांकित खासगी शाळा असून, ' त सर्वाधिक अर्ज पुण्यातच येतात. मात्र, नव्या अटींमुळे पालकांना मुलांच्या प्रवेशासाठी ' तून खासगी शाळेसाठी अर्जच करता येणार नाही. त्याच वेळी खासगी शाळांना अंतर्गत रिक्त राहणाऱ्या जागांवर मनमानी पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यास संधी मिळणार आहे. शालेय शिक्षण विभागाकडून समाजातील आर्थिक दुर्बल आणि घटकांमधील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी दर वर्षी ऑनलाइन पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येते.

# नागरिकांचा पुस्तकांचे गाव योजनेला प्रतिसाद - दीपक केसरकर

**मुंबई । वृत्तसेवा**

'पुस्तकांचे गाव' या योजनेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या योजनेचा विस्तार करण्यात येत असून मालपेवाडी येथे सुरू झालेल्या पुस्तकाच्या दालनाला मराठी भाषा प्रेमींनी अवश्य भेट द्यावी, असे आवाहन शालेय शिक्षण आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी केले. पुस्तकांच्या गावांना परदेशी पर्यटकही भेट देतील हे लक्षात घेऊन आणि त्यांच्यापर्यंत मराठी साहित्य पोहोचावे यासाठी महत्त्वाच्या मराठी पुस्तकांच्या इंग्रजी अनुवादांची श्राव्य पुस्तके उपलब्ध करून द्यावीत, अशी सूचना त्यांनी केली. 'हे ऑन वे' या वेल्स (इंग्लंड) मधील पुस्तकाच्या गावाच्या धर्तीवरील संकल्पनेनुसार राज्यात साकारलेल्या 'पुस्तकांचे गाव'



योजनेचा विस्तार करण्यात येत आहे. याअंतर्गत सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या देवगड तालुक्यातील मालपेवाडी, पोंभुर्ले या पहिल्या गावातील पुस्तक-दालनाचे उद्घाटन मंत्री श्री. केसरकर यांच्या हस्ते रविवारी झाले. मालपेवाडी येथे प्रातिनिधीक स्वरूपात मालपे ग्रो टुरिझम यांच्या कार्यालयात पुस्तक दालन तयार करण्यात आले असून पुढील काळात गावातील अन्य ठिकाणीही पुस्तकांची दालने सुरू करण्यात येणार आहेत. वाचकांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी राज्य मराठी विकास संस्थेद्वारे साहित्याचे जाणकार आणि तज्ज्ञ वाचक यांची पुस्तक निवड समिती गठित करण्यात आली आहे. या समितीद्वारे पुस्तकांची निवड करण्यात येऊन विविध साहित्य प्रकारांनुसार तसेच सर्वकाळ लोकप्रिय असणारी पुस्तके या दालनांमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. मराठी साहित्याचे वाचक व अभ्यासक या ग्रंथदालनाचा लाभ घेऊ शकतील. पुढील काळात वेरुळ, नवेगाव बांध आणि अंकलखोप येथेही पुस्तकांचे गाव उभारण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. लवकरच ही गावेही वाचक-पर्यटकांसाठी सुरू होतील, अशी माहिती राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ.शामकांत देवरे यांनी दिली. मालपेवाडी येथील दालनाच्या उद्घाटन प्रसंगी माणुसकी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद मालपेकर, संस्थेच्या नियामक मंडळाच्या आणि या प्रकल्पाच्या पुस्तक निवड समितीच्या सदस्य रेखा दिघे, देवगडचे तहसीलदार जनार्दन साहिले, पोंभुर्ले येथील स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. आप्पा बेलवलकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# ग्रामीण रस्त्यांसाठी कोटींचा निधी -आ.मोनिका राजळे

**पाथर्डी । वृत्तसेवा**

पाथर्डी मतदारसंघात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या सहकार्याने जिल्हा नियोजन मंडळाचा १ कोटी ४० लक्ष निधी रस्त्यांसाठी खर्च करण्यात आला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात निधी मिळविण्यात अडचणी येत होत्या; परंतु गेल्या दीड वर्षात शिंदे - फडणवीस व पवार सरकार सत्तेवर आल्यानंतर सर्वाधिक निधी



आणून मतदारसंघातील विकासकामे मार्गी लावण्यात आली असून, ग्रामीण रस्त्यांसाठी २५ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. आपण मतदारांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याची भूमिका घेतली असून, वीज, पाणी, रस्ते, हे महत्वाचे प्रश्न सोडवण्यासाठी निधी देण्यात असल्याचे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले. मळेगाव येथे विविध विकास कामांच्या भूमिपूजनप्रसंगी आ. राजळे बोलत होत्या. उपस्थित होते. आ. राजळे म्हणाल्या की, निवडणुका जवळ आल्यावरच विरोधक नारळ फोडतात, साड्या व भांडे वाटप करतात; परंतु त्यांचा पक्ष कोणता हे निश्चित नाही. पाटपाण्यासंदर्भात टेलपर्यंत पाणी देण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, लोकसभा निवडणुकीनंतर उर्वरित कामे मार्गी लावण्यात येतील, असेही त्या म्हणाल्या. या वेळी बापुसाहेब पाटेकर यांचेही भाषण झाले. प्रास्ताविक शिवाजी भिसे यांनी केले. यांनी आभार मानले.


## महाराष्ट्रात कोणाला उमेदवारी देणार ?

मुंबई - निवडणुकीबाबत दिल्लीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीतील बैठकीत महाराष्ट्रातील उमेदवारांची चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या बैठकीत राज्यातील काही उमेदवारांच्या नावाची चर्चा झाली आहे. कोल्हापूरसाठी समरजित घाटगे यांच्या नावाची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने जागा सोडली नाही तर समरजित घाटगे हे धनुष्यबाणाच्या चिन्हावर लढणार, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. सांगलीतून खासदार संजयकाका पाटील यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. पुण्यातून मुरलीधर मोहोळ यांच्या नावाची चर्चा आहे. बीडमधून खासदार प्रितम मुंडे यांच्या ऐवजी पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची नवी दिल्लीत भाजपच्या मुख्यालयात बैठक बोलावण्यात आली आहे.

# नियमित बदली नसली तरी रिक्त जागी आता शिक्षकांची होणार बदली

**नागपूर । वृत्तसेवा**

नवीन भरती होण्यापूर्वी गैरसोयीत असलेल्या शिक्षकांची सोय होण्याकरिता महाराष्ट्राचे प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शासनाकडे वारंवार प्रयत्न करण्यात आले होते. याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने २६ जून २०२३ चा शासन निर्णय देऊन भरती पूर्व प्राथमिक शिक्षकांची बदली करण्याचा आदेश दिला होता. दरम्यान, ग्रामविकास विभागाने सोमवारी नवा आदेश काढत यंदा नियमित बदली नसली तरी रिक्त जागेवर आता विनंतीने शिक्षकांची बदली होणार असल्याचे सांगितले आहे. मागील वर्षी नवीन शिक्षकांची भरती झाली नसली तरी यंदा मात्र पवित्र पोर्टलद्वारे नव्याने मोठ्या प्रमाणात शिक्षक भरतीची प्रक्रिया पार पाडली गेली आहे. लवकरच या शिक्षकांची नियुक्ती केली जाणार



असून यापूर्वी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या शिक्षकांची गैरसोय दूर व्हावी, या उद्देशाने पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे नेते संभाजीराव थोरात यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सरचिटणीस बाळासाहेब झावरे, राज्य सरचिटणीस आबासाहेब जगताप व राज्य कार्यकारी अध्यक्ष म.ज. मोरे, राज्य सल्लागार मंडळाचे अध्यक्ष लहू कांबळे यांच्या शिष्टमंडळाने चार दिवसापूर्वी ६ आणि ७ मार्च रोजी राज्य शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे पाठपुरावा केला. याची दखल घेत उपसचिव शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांनी २०२३ च्या या शासन निर्णयाची अंमल करण्यास सांगितले. याची अंमलबजावणी राज्यातील काही जिल्हा परिषदेने करण्यास सुरुवात केली असली तरी संबंधित ग्रामविकास विभागाकडून सदरचे पत्र निघाले नसल्याने सोलापूर जिल्ह्यात शिक्षण विभागाकडून कोणतीही हालचाल झाली नव्हती. मात्र या पत्राने बदलीचा मार्ग मोकळा होऊन काही शिक्षकांची का होईना रिक्त जागेवर बदली होऊन त्यांची सोय होईल, अशी अपेक्ष सर्वसामान्य शिक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. लवकरच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असताना वेळेत जिल्हा परिषद शिक्षण विभाग बदलीची प्रक्रिया करेल का, हे पाहावे लागणार आहे. बदली झाल्याच तर सदरच्या बदल्या ह्या रिक्त पदावर होणार असून आपल्या जिल्ह्यात साधारणपणे सर्व माध्यम मिळून तीनशेहून अधिक पदे रिक्त असल्यामुळे तितक्याच बदल्या होतील, हे मात्र नक्की. सदर बदलीची प्रक्रिया राबविल्यास गैरसोयीत असलेल्या सर्व शिक्षकांची सोय होत नसली तरी २०१८-२०१९ च्या बदलीमध्ये खूप लांबच्या अंतरावर विस्थापित झालेल्या बऱ्याच शिक्षकांची काहीअंशी का होईना शाळेचे अंतर कमी होऊन सोय होण्याची शक्यता आहे, परंतु आपल्या शिक्षण विभागाने लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी तत्काळ ही प्रक्रिया राबवावी.

## लातुरमध्ये नात्यात वितुष्ट येवून ठार मारले

लातूर - कनात्यामध्ये वितुष्ट निर्माण होऊन हाणामारी अन् खुनाच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. अशीच एक घटना लातूर जिल्ह्यातील तोंडार पाटी येथे घडली. शेतीसाठी चक्क मुलानेच आईचा निर्घृण खून केला. एवढेच नव्हे तर गुन्हा लपविण्यासाठी बलात्कार करून कोणीतरी खून केल्याचा बनाव केला. पण पोलिसांच्या नजरेतून तो सुटू शकला नाही. अखेर पोलिसांनी प्रकरणाचा छडा लावला. संशयित आरोपी मुलाला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने गुन्हा कबूल केला. खुनाची ही घटना लातूर जिल्ह्यात असणाऱ्या उदगीर तालुक्यातील तोंडार पाटी येथे २४ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी उघडकीस आली होती. आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जनसेवा फाउंडेशनच्या कार्यक्रमाला महिलांची अलोट गर्दी

**नगर । वृत्तसेवा**

नगर तालुक्यातील नवनागापूर येथे जनसेवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आणि सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमासाठी महिलांनी उत्स्फूर्तपणे दर्शविलेल्या सहभागाने परिसर अगदी फुलून गेला होता. इतकी अफाट आणि मोजता न येणारी महिला भगिनींची संख्या पाहून एखाद्या भव्य पर्वाचीच अनुभूती सर्वांना झाली. या कार्यक्रमात खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुजय विखेंनी या सर्व महिलांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी दिग्गज संगीतकार व अजय अतुल या जोडीने उपस्थित महिलांना आपल्या गाण्यावर ताल धरण्यात भाग पाडले. तसेच अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि मानसी नाईक यांनी आपल्या नृत्याने उपस्थितांचा उत्साह वाढविला. या सांस्कृतिक महोत्सवात महिलांचे मनोरंजन करण्याच्या अनुषंगाने आयोजित या कार्यक्रमांव्यतिरिक्त भव्य लकी ड्रॉ स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महिलांना पैठणीसह विविध आकर्षक बक्षिसे देखील देण्यात आली. या कार्यक्रमात महिला संघटन करणार्या अरुणाताई नानाभाऊ कांबळे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अर्चना नांगरे आघाव, कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणार्या ह.भ.प. उज्वलाताई ठोंबरे, श्रीराम विद्यालय, राळेगण येथे मुख्याध्यापिका या पदावर उत्कृष्ट कार्य करणार्या तारका रंगनाथ भापकर, शिवव्याख्याता प्रणालीताई बाबासाहेब कडूस, कोविड काळात उत्कृष्ट सेवा देणार्या डॉ. निवेदिता माने, अंगणवाडी अनेक महिलांना रोजगार उपलब्ध करून देणार्या अश्विनी कोळपकर, गृह उद्योग सुरू करणार्या मिना बेरड, जगदंबा महिला स्वयंसहायताच्या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला.

# विधानसभा ते राज्यसभा निवडणूक प्रक्रिया

निवडणूक ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये मतदार नियमितपणे त्यांचे प्रतिनिधी निवडतात आणि ते कधीही बदलू शकतात. लोकशाहीचा गाभा म्हणजे निवडणूक. प्रतिनिधी निवडण्यासाठी निवडणुका झाल्या पाहिजेत. बहुतेक लोकशाहीत लोक त्यांच्या प्रतिनिधींद्वारे राज्य करतात. लोक त्यांच्या नेत्यांना मान्यता देतात की नाही हे ठरवण्यासाठी निवडणुका मदत करतात. निवडणुकीमध्ये मतदारांना विविध पर्याय असतात. राज्य विधानसभेचे सदस्य त्यांच्या विधानसभा क्षेत्रातून मतदानाद्वारे निवडले जातात. प्रत्येक प्रौढ भारतीय नागरिकाला फक्त ते राहत असलेल्या मतदारसंघात मतदान करण्याची परवानगी आहे. राज्य विधानसभेतील जागा जिंकणाऱ्या उमेदवारांना विधानसभा सदस्य (चङ-) म्हणून संबोधले जाते आणि ते पाच वर्षे किंवा राज्यपालांनी विधानसभा विसर्जित करेपर्यंत ते पदावर असतात. लोकसभेचे सदस्य, किंवा भारताच्या संसदेचे कनिष्ठ सभागृह, भारतातील सर्व प्रौढ नागरिक त्यांच्या विशिष्ट जागांसाठी त्यांच्या मतदार संघातून निवडले जातात. प्रत्येक प्रौढ भारतीय नागरिकाला फक्त ते राहत असलेल्या मतदारसंघात मतदान करण्याची परवानगी आहे. संसदाचे सदस्य म्हणजे लोकसभा निवडणुकीत विजय मिळविलेल्या आणि पाच वर्षांसाठी किंवा राष्ट्रपती, मंत्रीपरिषदेच्या सल्ल्यानुसार, लोकसभा विसर्जित करेपर्यंत त्यांच्या जागा धारण करणाऱ्या उमेदवारांना सूचित करतात. नवीन कायदे लागू करणे, सध्याचे कायदे रद्द करणे आणि सर्व भारतीय नागरिकांना प्रभावित करणाऱ्या विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणा यासारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी संसद भवनाच्या लोकसभा चेंबर्समध्ये सभागृहाची बैठक होते. दर पाच वर्षांनी एकदा लोकसभेचे ५४३ सदस्य निवडले जातात. राज्यसभा, ज्याला सामान्यतः राज्य परिषद म्हणून ओळखले जाते, हे भारताचे संसदेचे उच्च सभागृह आहे. उमेदवारांची निवड नागरिकांऐवजी विधानसभेच्या सदस्यांद्वारे केली जाते आणि कला, साहित्य, विज्ञान आणि सामाजिक सेवांमधील योगदानासाठी भारताच्या राष्ट्रपतींद्वारे १२ पर्यंत नामनिर्देशित केले जाऊ शकते. राज्यसभेच्या सदस्यांचा कालावधी सहा वर्षांचा असतो, ज्यामध्ये एक तृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी पुन्हा निवडून येतात. एखादे विधेयक कायदा होण्यापूर्वी, राज्यसभा ही द्वितीय-स्तरीय पुनरावलोकन संस्था म्हणून काम करते. भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून काम करतात, तिच्या कामकाजाचे अध्यक्ष असतात. विधान प्रस्ताव (नवीन कायदे तयार करणे, विद्यमान कायद्यांना रद्द करणे किंवा अतिरिक्त अटी जोडणे) हे विधेयकाच्या स्वरूपात संसदेच्या कोणत्याही सभागृहात सादर केले जातात. देशातील निवडणुकांवर स्वतंत्र आणि शक्तिशाली निवडणूक आयोग (एउ) देखरेख करतो. त्यात न्यायपालिकेइतकीच स्वायत्तता आहे. मुख्य निवडणूक आयुक्त (उएउ) यांची नियुक्ती भारताचे राष्ट्रपती करतात. एकदा नियुक्त झाल्यानंतर सीईसी राष्ट्रपती किंवा सरकारला जबाबदार नसतो. निवडणूक आयोगाला खालील अधिकार आहेत. निवडणुकीच्या घोषणेपासून ते निकाल जाहीर करण्यापर्यंत निवडणूक आचार आणि नियंत्रणाच्या सर्व पैलूंवर ते निर्णय घेते. आचारसंहिता लागू करणे आणि ती मोडणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला किंवा राजकीय पक्षाला शिक्षा करणे ही जबाबदारी आहे. निवडणूक आयोगाला संपूर्ण निवडणूक कालावधीत सरकारला काही मानकांचे पालन करण्याचे आदेश देण्याचा अधिकार आहे. प्रशासनाच्या निवडणुका जिंकण्याच्या किंवा काही सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या शक्यता सुधारण्यासाठी ही मानके सरकारी शक्तीचा वापर आणि दुरुपयोग प्रतिबंधित करतात. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांवर सरकार नव्हे तर निवडणूक आयोग आहे. काही बूथ किंवा शक्यतो संपूर्ण मतदारसंघातील मतदान अयोग्य असल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांना वाटत असल्यास, ते पुन्हा मतदान करण्याची विनंती करतात.

## सिव्हिल इंजिनिअर निघाला चोर

बीड – नगर येथील एक २१ वर्षीय सिव्हिल इंजिनिअर कडा येथे गाईंची चोरी करताना दोन साथीदारांसह रंगेहाथ पकडला गेला. शिवराज सुनिल पवार, सोमनाथ संतोष कर्डिले, रोहित गोरख रोखले अशी आरोपींची नावे आहेत. आष्टी तालुक्यातील शेरी बुद्रुक येथील २१ वर्षीय तरुण शिवराज सुनिल पवार हा सिव्हिल इंजिनिअर आहे. मागील तीन वर्षापासून तो आईसह अहमदनगर येथे राहत आहे. सोमवारी रात्री कडा येथील बाळू धोंडीबा ओव्हाळ यांच्या गोठ्यात बांधलेल्या दोन गाई छोट्या टेम्पोमध्ये टाकून (एम.एच.१६, ए. वाय.८९९२) चोरीस गेल्या. चोरीचा सुगावा लागताच ग्रामस्थ आणि पोलिसांनी पाठलाग करत बीड-अहमदनगर राज्य महामार्गावरील उंदरखेल येथे टेम्पो अडविला. यावेळी टेम्पोतील गाईंची सुटका करण्यात आली. तर चोरटे शिवराज सुनिल पवार, सोमनाथ संतोष कर्डिले (१९, रा. डोंगरगण रोड कडा ता. आष्टी) आणि रोहित गोरख रोखले (२१ रा. नालेगांव अहमदनगर) यांना पोलिसांनी अटक केली. हे तिघे चोरीच्या गाईंची नंतर बाजारात विक्री करत असल्याची माहिती पुढे आली आहे. याप्रकरणी बाळू धोंडीबा ओव्हाळ याच्या फिर्यादीवरून मंगळवारी पहाटे आष्टी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही कारवाई आष्टीचे उपअधीक्षक अभिजीत धाराशिवकर, पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस याच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, पोलीस नाईक विकास जाधव, पोलीस अंमलदार मजख्दीन सय्यद, दिपक भोजे, सचिन गायकवाड, वाहन चालक प्रदिप घोडके यांनी केली. पुढील तपास पोलीस नाईक विकास जाधव करीत आहेत.

## सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

बीड -येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड, संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय आद्य शिक्षिका समाज क्रांतिकारक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी 'तया तयास मानव म्हणावे का, शिकण्यासाठी जागे व्हा' क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या काव्य गीताचे गायन करून विद्यार्थ्यांनी त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक बी.ए आवळे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये महात्मा फुले यांच्या समाजकार्य सहकार्य आणि प्रेरणा यांचा अंगीकार करून जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले असे विचार प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या शाखेचा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ

अंबाजोगाई – बँकेच्या ग्राहकांनी घेतलेले कर्ज हे नियमितपणे भरून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन नांदेड येथील गोदावरी अर्बन मल्टिस्टेटच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती राजश्री हेमंत पाटील यांनी मांडली. त्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या चौसाळकर कॉलनी, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील १८व्या शाखेच्या शुभारंभ सोहळ्याप्रसंगी बँकेच्या उद्घाटिका म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, नांदेड जिल्हा शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष बाबुराव कदम कोहळीकर , बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी,प्रा. वसंत चव्हाण तसेच बँकेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या शुभारंभ सोहळ्याची सुरुवात दीप प्रज्वलन करून त्याचबरोबर माता योगेश्वरी देवी तसेच धर्मवीर संभाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले.

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड, बीड

# पाटोदा तालुक्यातील रस्ता विकास आराखड्यासाठी १७८ कोटी -आ.आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वडझरी डोमरी रोहतवाडी थेरला सावरगाव सोनेगाव दासखेड पाथरी पाचंग्री यासह परिसरातील ग्रामस्थांनी रामा ५९ रामा ५५ वडझरी ते रोहतवाडी व थेरला ते पाचंग्री हा रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्याचे काम लवकरात लवकर करावे अशी मागणी गेल्या काही दिवसापासून केली होती त्या मागणीचा विचार करत आपण प्रमुख असलेला रस्ता हिवर शिंगा रामा ५९ पासून वडझरी डोंमरी रोहतवाडी रामा ५५ वर थेरला सावरगाव सोनेगाव दासखेड पाचंग्री प्रतिमा १९, ०० ते ४१ की मी मध्ये रुंदीकरणासह सुधारणा करणे या रस्त्यासाठी हायब्रीड एन्वीटी अंतर्गत १७७ कोटी ७२ लाख रुपये मंजूर करून घेतले असून मतदारसंघाच्या वतीने आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस कृषी व पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब बांधकाम मंत्री चव्हाण यांच्यासह राज्य सरकारचे आभार मानत असल्याचे आ आजबे यांनी सांगितले. आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील अनेक विकास कामे ही महायुती सरकारच्या सरकार मध्ये झाली आहेत, वेगवेगळ्या माध्यमातून विविध विकासकामे सुरू आहेत गेल्या वर्षभरात हजारो कोटी रुपयांचे विकासकामे आपण मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजितदा पवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री धनंजय जी मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मंजूर करून आणले आहेत त्यामध्येच आजच मंजूर झालेला पाटोदा तालुक्यातील रामा ५९ पासून वडझरी डोमरी रोहितवाडी रामा ५५ वर थेरला ते पाचंग्री या रस्त्यासाठी रुंदीकरणासह सुधारणा करणे या कामासाठी तब्बल १७७ कोटी ७२ लाख मंजूर घेतला आहे असे यावेळी त्यांनी सांगितले या रस्त्याचा अनेक दिवसापासूनचा प्रश्न होता अतिशय खराब हा रस्ता झाला होता या भागातील दळणवळणाचा प्रमुख रस्ता असल्याकारणाने त या रस्त्याच्या कामासाठी आपण प्राधान्याने लक्ष देऊन लोकांच्या मागणीचा विचार करत मंजूर करून घेतला आहे असे त्यांनी सांगितले,हा रस्ता मंजूर केल्याबद्दल पटोदा तालुक्याच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने आमदार बाळासाहेब आजबे काका यांचे अभिनंदन करण्यात आले, दोन दिवसापूर्वीच आमदार आजबे यांनी आष्टी पाटोदा व शिरूर नगरपंचायत साठी १० कोटी रुपये मंजूर करून आणले आहेत त्यामुळे मतदारसंघात गावागावात विकास कामे सुरू आहेत . यापुढेही आवश्यक त्या ठिकाणी काम देण्याचा प्रयत्न आपण करणार असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी शेवटी सांगितले.



# आष्टी येथील फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थिनींनी पोस्टर प्रेजेंटेशनमध्ये पटकावला प्रथम क्रमांक

**आष्टी । प्रतिनिधी**

कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च आष्टी येथील विद्यार्थिनींनी पुणे येथे आयोजित केलेल्या पोस्टर प्रेजेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. पुणे येथील लोटस स्कूलने फार्मा सुमित २०२४ चे आयोजन केले होते यामध्ये फार्मसी विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन ठेवले होते यामध्ये जवळजवळ ४०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यामध्ये आष्टी येथील बी फार्मसी कॉलेजच्या तिसऱ्या वर्षातील कुमारी लगड राजनंदिनी रतन व




कुमारी भोज साक्षी सुरेश यांनी उत्कृष्ट असे पोस्टर बनवून सादरीकरण केले, यामध्ये त्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले, रोख ७ हजार रुपये व सन्मानचिन्ह व सर्टिफिकेट अशी या पारितोषकाचे स्वरूप होते. प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल या विद्यार्थिनींचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. भीमरावजी धोंडे साहेब, संचालक ,अभय धोंडे तसेच प्रशासन अधिकारी डॉ. डी बी राऊत , शिवदास विधाते, दत्तात्रय गिलचे ,माऊली बोडखे ,संजय शेंडे यांनी सर्वांचे अभिनंदन केले. या पोस्टर प्रेजेंटेशन साठी कॉलेजच्या सह. प्राध्यापिका कुमारी अत्तार तबसुम्म यांचे विद्यार्थिनींना मार्गदर्शन लाभले, असे कॉलेजचे प्राचार्य डॉ.सुनील कोल्हे यांनी सांगितले.

## हंगामी वसतिगृह नावालाच

बीड – जिल्ह्यातील ८ लाख कामगार राज्यासह परराज्यात ऊसतोडणीला जातात. त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी समग्र शिक्षाअंतर्गत २२० हंगामी वसतिगृह सुरू केली. यात २१ हजार ४९० मुले असल्याचा दावा बीडचा शिक्षण विभाग करत आहे. परंतु कोल्हापूरच्या 'अवनी' संस्थेने कोल्हापूर जिल्ह्यातील ११ कारखान्यांवर जाऊन सर्वेक्षण केले. तर ० ते १८ वयोगटातील तब्बल १८३९ मुले, मुली हे अंगणवाडी, शाळा सोडून उसाच्या फडात असल्याचे समोर आले आहे. राज्यात १९१ साखर कारखाने आहेत. त्यातील ३५ कोल्हापूर जिल्ह्यात आहेत. यातीलच ११ कारखान्यांचे सर्वेक्षण अवनी संस्थेने केले. यात जे शाळाबाह्य मुले आढळली त्यांची यादी त्यांनी बीडच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठानचे तत्त्वशील कांबळे आणि जागर प्रतिष्ठानचे अशोक तांगडे यांना पाठवली. आता त्यांच्याकडून उलट तपासणी केली जात आहे.

## प्रा.तोंडे यांना पुरस्कार

**धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील सोनिमोहा येथील रहिवासी तथा मुंबईच्या संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालयाचे हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. रामदास नारायण तोंडे यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा काका कालेलकर रौप्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा सन् २०२३-२४ या वर्षाचा पुरस्कार सोहळा सोमवार दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.या भव्य समारंभात अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शितला प्रसाद दुबे व अकादमीचे सन्माननीय सदस्य यांच्या शुभ हस्ते डॉ.रामदास तोंडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# गाडीचा धक्का लागल्यामुळे मारहाणप्रकरणी ४० ते ५० जणांविरोधात गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

गाडीचा धक्का लागल्याने स्वराज्य संघटनेच्या जिल्हाध्यक्षास काही जणांनी मारहाण केली. त्यानंतर जमावाने जिल्हाध्यक्षाच्या घरावर दगडफेक करून त्यांच्या व इतरांच्या गाड्यांची तोडफोड केली. या घटनेने बालेपीर परिसरात रात्री तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. हातात तलवार, दांडे इतर घातक शस्त्र घेवून दहशत निर्माण केल्याने नागरीकात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी शिवाजी नगर पोलिस ठाण्यात ४० ते ५० जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सुरज जायभाये यांच्या गाडीचा उमेश जाधव यांना धक्का लागला होता. यातून वाद निर्माण झाला. या वादातून जायभाये यांना रितेश जाधव, गणेश गिरी, रोहन जाधव, वैभव जाधव यांच्यासह आदी लोकांनी मारहाण करत त्यांच्या घरावर दगडफेक केली. तसेच त्यांची गाडी (एम.एच. २३ बी.सी ४२२३) या गाडीच्या काचा फोडण्यात आल्या त्याच बरोबर बुलेट, प्लसर, सुझुकी, ॲक्सेस स्कुटी यासह इतर गाड्यांचे नुकसान करण्यात आले. जमावाने हातात घातक शस्त्र घेवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे बालेपीर परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

# विमा कंपनीने अग्रीमचे ७६ कोटी केले मंजूर

**बीड । प्रतिनिधी**

पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी कृषी विभाग, विमा कंपनी तसेच कृषी विद्यापीठातील हवामान तज्ञ यांच्या एकत्रित बैठका घेऊन यशस्वी वाटाघाटी केल्याने बीड जिल्ह्यासाठी खरीप हंगाम-२०२३ च्या अग्रीम पीक विम्या पोटी दुसऱ्या टप्यात ७६ कोटी २७ लाख रुपये इतकी नुकसान भरपाई भारतीय पिक विमा कंपनीने मंजूर केले असून त्याच्या वितरणास सुरुवात झाली आहे. लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर या रक्कमा जमा होण्यास सुरुवात झाली आहे. खरीप हंगाम २०२३ मधील पावसाच्या सततच्या खंडाने झालेल्या नुकसानापोटी २५% अग्रीनुसार पहिल्या टप्यात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २४१ कोटी रुपये इतकी नुकसान भरपाई विमा कंपनीने मंजूर केली होती. त्यापैकी सुमारे २४० कोटी रुपयांचे आतापर्यंत वितरण पूर्ण झाले आहे, तर आधार व्हेरिफिकेशन सारख्या तांत्रिक बाबींमुळे सुमारे एक कोटी रुपये रकमेचे वितरण प्रलंबित आहे. बीड जिल्हा दौ-यावर असताना राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी भारतीय पीक विमा कपनीच्या अधिकाऱ्यांशी तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क करून त्यांच्याकडून पहिल्या टप्यातील १००% वितरण तसेच दुसऱ्या टप्यातील प्रलंबित विमा रक्कम तातडीने मंजूर करून तात्काळ वितरण करण्याबाबत निर्देश दिले होते.

# गोडाऊनमधून सोयाबीनचे कट्टे चोरणारी टोळी जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

गोडाऊनमधून सोयाबीनचे कट्टे चोरणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे. बनसारोळा येथील क्रांतीज्योती ॲग्रो प्रोडचुसर कंपनीचे पत्राचे गोडावूनचे पाठीमागील खिडकीचे गज वाकवून आत प्रवेश करून गोडावून मधील सोयाबिनचे एकुण ११४ सुतळी कट्टे वजन अंदाजे ७० क्विंटल चार हजार प्रमाणे एकुण २ लाख ८० हजारांचा माल अज्ञात चोरटयांनी चोरुन नेला होता. याप्रकरणी युसूफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपस करत असतांना पोलिसांना माहिती मिळाली कि, इसम नामे संतोष प्रभाकर कुऱ्हाडे रा. आंकलखोप सुभाषनगर जि.सांगली याने त्याचे आयशर टॅम्पोमध्ये ढोकी ता. जि. धाराशिव येथील त्याचे साथीदारासह मौजे बनसारोळा ता. केज जि.बीड येथील सोयाबीन चोरी केलेली आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळताच तपास केला असता त्याने व त्याच्या साथीनेच हे कट्टे चोरल्याचे सामोरे आले. याप्रकरणी दादा उध्दव चव्हाण, महादेव सुरेश चव्हाण या दोघांना ताब्यात घेऊन चोरी गेलेले २ लाख ८० हजाराचे ११४ कड्यांपैकी १ लाख ६५ हजारांच्या किमतीचे ६९ कट्टे परत मिळून दिले. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकुर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे, पअर्जुन यादव, अश्विनकुमार सुरवसे, अतुल हराळे यांनी केली आहे.

# उष्मघातापासून बचाव, लक्षणे व उपाययोजना

**बीड । प्रतिनिधी**

सध्या वातावरणात होणारा बदल म्हणजे वाढते तापमान हे होय. वाढत्या तापमानामुळे उष्मघाताची बाधा होण्याची दाट शक्यता असते. परिणामी उष्मघातामुळे मृत्यू देखील होऊ शकतात. त्यामुळे हे टाळण्यासाठी नागरिकांनी काय काळजी घ्यावी याबाबत जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी पुढीलप्रमाणे नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. उन्हाळयामध्ये पांढ-या रंगाचे किंवा फिकट रंगाचे सैलसर कपडे घालावेत. बाहेर फिरतांना डोक्याला रुमाल बांधावा व डोळयावर गॉगल घालावा जेणे करुन डोके व डोळयाची काळजी घेता येईल. बाहेर जाताना पिण्याचे पाणी बॉटल सोबत ठेवावी व नियमित पाणी पित रहावे. उन्हाळयामध्ये दुपारनंतर बाहेर फिरणे टाळावे. बाहेर उन्हात काम करणारे



शेतकरी, मजूर वर्ग यांनी आपली कामे सकाळी व संध्याकाळी करावीत. दुपारी काम करणे टाळावे. उन्हाळयामध्ये दिवसभर सतत पाणी पिणे,अथवा द्रव पदार्थाचे नियमित सेवन करावे. तीव्र स्वरुपाचा ताप येणे, थकवा येणे, डोके दुखणे, नाडीचे डोके मंद होणे, चक्कर येणे, उलटी होणे हातापायात गोळे येणे, काही रुग्णामध्ये पोटाच्या स्नायुत मुरडा येणे, खुप घाम येणे ही लक्षणे असतात. खुप घाम आल्यामुळे रक्तामधील द्रव पदार्थ कमी होतात. त्यामुळे रक्ताचा घटटपण वाढून महत्वाचे अवयव ज्यामध्ये मेंदु, -हदय,किडणी यांना रक्त पुरवठा सुरळित होत नाही. त्यामुळे रुग्णाना -हदय विकाराचा झटका येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उच्च रक्तदाब, -हदय विकार, मधुमेह इत्यादी आजार असणा-यांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या रुग्णांनी दिवसभरात द्रव पदार्थाचा आहार पाणी नियमित पिणे, उन्हात न फिरणे त्याचबरोब आरोग्य विषयक काही तक्रार असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. उष्मघातामुळे ज्याप्रमाणे मृत्यू होवु शकतात त्याचप्रमाणे वाढत्या तापमानामुळे -हय विकाराचा झटका येण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही. त्यामुळे उन्हामध्ये न फिरणे, घरात खेळती हवा ठेवणे, पंखे, कुलर, ए.सीचा वापर करावा. वायु प्रदुषाणामुळे बालकामध्ये आणि गरोदर मातांमध्ये आरोग्य विषयक तक्रारी निर्माण झाल्यास असे रुग्ण ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय येथे बाहय्, अंतरुग्ण म्हणून आल्यास वेगळी नोंद ठेवावी. बीड जिल्हयातील सर्व नगरपरिषदांनी वर्दळीच्या ठिकाणी निर्जतुंक पाणी पिण्यासाठी पाणपोई लोकसहभागातुन उपलब्ध करुन द्यावी, शहरातील उद्याने दिवसभर चालु ठेवावेत, दुपारच्या कालावधीमध्ये भर उन्हात सभा घेण्याच्या परवानग्या देऊ नये, सभा सकाळी व सायंकाळच्या वेळेत घेण्यास परवानग्या द्याव्यात. सूचना जिल्हाधिकारी यांनी वातावरणीय बदल आणि मानवी आरोग्य जिल्हा टास्क फोर्स या बैठकीमध्ये दिल्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com